वर्ष-०७ | अंक-१६ | मुंबई, मंगळवार ०९ ते १५ मार्च २०२१ | पृष्ठ-४

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक ●कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक ● सह संपादक : सौ. अश्विनी नाईक परब

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

PG 2 अल्पवयीन मुलीची छेड; पीडितेची आई, काकाने केलेल्या मारहाणीत आरोपीचा मृत्यू

3 → या शेताने लळा लाविला असा असा की..

कारकर्जात फसवणूक; दोघाविरुद्ध गुन्हा ← 4

## रेल्वेने बंद केले सर्व इमरजेन्सी नंबर आता या एकाच हेल्पलाईन नंबरवर करा तक्रार



नवी दिल्ली, भारतीय रेल्वेने प्रवाशांना अधिक चांगली सुविधा देण्याच्या उद्देशाने अनेक इमरजेन्सी नंबर बंद केले आहेत. आता यात सुविधा काय असं वाटू शकतं. परंतु भारतीय रेल्वेने प्रवाशांच्या सोयीसाठीच आता सर्व तक्रारी, सूचना आणि ...पान २ वर...

## मुंबईत कोरोना धोका वाढला या उच्चभ्रू भागामुळे; पब्जमुळे वाढली संख्या, पुढे आली धक्कादायक आकडेवारी

मुंबई, दोन महिन्यांपूर्वी चांगली आटोक्यात आली असं वाटत असलेली कोरोनाची साथ पुन्हा एकदा जोमाने फोफावत आहे. राज्यातल्या इतर जिल्ह्यासारखंच मुंबईतही कोरोनाचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. ...पान २ वर...

# खूशखबर! ठाकरे सरकारच्या अर्थसंकल्पात महिलांसाठी पाच मोठ्या घोष□ा; जा□ून घ्या



राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला आहे. यामध्ये जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने ठाकरे सरकारने महाराष्ट्रातील तमाम महिलांसाठी भरघोस घोषणा केल्या आहेत. जाणून घ्या महत्त्वाच्या पाच घोषणा...

मुंबई: राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज राज्याचा अर्थसंकल्प सादर केला आहे. यामध्ये जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने ठाकरे सरकारने महाराष्ट्रातील तमाम महिलांसाठी भरघोस घोषणा केल्या आहेत.

अजित पवारांनी राज्यातील महिलांसाठी 'राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजने'ची घोषणा केली आहे. यामध्ये त्यांनी 01 एप्रिल 2021 पासून महिलेच्या नावाने घर घेतल्यास मुद्रांक शुल्कात 1 टक्का सवलत दिली जाणार आहे. त्यामुळे राज्याच्या महसुलामध्ये 1000 कोटींची तूट येण्याची शक्यता आहे, असंही अजित पवारांनी स्पष्ट केलं आहे.अजित पवारांनी राज्यातील महिलांसाठी 'राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजने'ची घोषणा केली आहे. यामध्ये त्यांनी 01 एप्रिल 2021 पासून महिलेच्या नावाने घर घेतल्यास मुद्रांक शुल्कात 1 टक्का सवलत दिली जाणार आहे. त्यामुळे राज्याच्या महसुलामध्ये 1000 कोटींची तूट येण्याची शक्यता आहे, असंही अजित पवारांनी स्पष्ट केलं आहे.

अजित पवारांनी राज्यातील महिलांसाठी 'राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजने'ची घोषणा केली आहे. यामध्ये त्यांनी 01 एप्रिल 2021 पासून महिलेच्या नावाने घर घेतल्यास मुद्रांक शुल्कात 1 टक्का सवलत दिली जाणार आहे. त्यामुळे राज्याच्या महसुलामध्ये 1000 कोटींची तूट येण्याची शक्यता आहे, असंही अजित पवारांनी स्पष्ट केलं आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विद्यार्थिनी प्रवास सवलत योजना - राज्यातील मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सर्व ग्रामीण तालुक्यातील विद्यार्थिनींना आपल्या गावापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या बसने मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही राज्यव्यापी योजना आहे.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विद्यार्थिनी प्रवास सवलत योजना - राज्यातील मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सर्व ग्रामीण तालुक्यातील विद्यार्थिनींना आपल्या गावापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या बसने मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही राज्यव्यापी योजना आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विद्यार्थिनी प्रवास सवलत योजना - राज्यातील मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सर्व ग्रामीण तालुक्यातील विद्यार्थिनींना आपल्या गावापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या ...पान २ वर...

# नाला सोपारा येथे पोलिसांनी केली धडक कारवाई




अनधिकृत व बेकायदेशीर रित्या वास्तव्य करणारे परकीय नागरिकांविरुध्द धडक - कारवाई खालीलप्रामणे - करण्यात आली आहे.

१) नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीत अनधिकृत परदेशी नागरीकांवर कारवाई करीता दिनांक ०५/०३/२०२१ रोजी पहाटे ०६.३० वा. ते ०९.३० वा. पावेतो हनुमान नगर, येथे कोम्बींग ऑपरेशनचे आयोजन करण्यात आले.

भादवि.स.कलम १८८ प्रमाणे १३ गुन्हे दाखल करण्यात आले.

एकुण १७ नायजेरीयन परकिय नागरीक हे पोलीस व्हेरीफिकेशन न करता बेकायदेशीर रित्या वास्तव्य करीत असल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले असुन पुढील कारवाई चालु आहे.

७ संशयीत वाहने चेक केले १८, ताब्यात घेतली ०९

सदर कारवाई करीता १४ पोलीस अधिकारी, ...पान २ वर...

## लोखंडासह ट्रक लुटला; सात आरोपी ताब्यात



लोखंडी सळाखी वाहून नेणाऱ्या ट्रकच्या चालकाला मारहाण करून ट्रक ताब्यात घेत सुमारे १२,४५,६३३ रुपयांच्या मुद्देमालाची विक्री केली. नंतर ट्रक सोडून फरार झालेल्या नागपूर जिल्ह्यातील सात आरोपींना गोंदियाच्या स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे. आरोपींकडून १४ लाख ३५ हजार ६६३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नागपुरातील मानकापूर परिसरातील प्रवीण धांडे हे २८ फेब्रुवारीला ट्रकमध्ये रायपुरातील लिंगराज कंपनीमधून लोखंडी सळाखी घेऊन परत येत होते. देवरी महामार्गावर पांढऱ्या रंगाच्या कारमधून सात जण आले. त्यांनी ट्रक अडवून धांडे यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यांचे हात-पाय बांधून ट्रकचा ताबा घेतला. नंतर हा ट्रक चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड परिसरातील नवखडा गावाजवळ आणला.

धांडे यांनी सोडून फरार झाले. धांडे यांनी नागभीड पोलिसात तक्रार दाखल केली. गुन्हा देवरी ठाण्यांतर्गत घडला असल्याने प्रकरण हस्तांतरित करून पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनात तपास पथके तयार करून शोध सुरू करण्यात आला.



**वर्सोवा व डी एन नगर डी एन नगर पोलीस ठाणे एसीपी मॅडम जोशना विलास रासम जागतिक महिला दिनानिमित्त फुल गुच्छ देऊन स्वागत केले पोलीस बातमीपत्राचे पत्रकार प्रवीण सुर्वे संजय शेकोकार तसेच गणेश जाधव व लक्ष्मण पटेल उपस्थित होते**

## भाईदर पथकाने केली 16 वर्षीय पिडीत अल्पवयीन मुलीची वेश्या व्यवसायातून सुटका



मिरारोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील म्हाडा बिल्लींग, मिरारोड पुर्व या ठिकाणी अल्पवयीन मुलीकडुन जबरदस्तीने कौमार्यभंग करण्याकरीता जास्त रक्कम घेवुन वेश्या व्यवयसाय चालवीला जात असल्याची बातमी मिळाली वरुन अमावाशा,

भाईदरचे वपोनि/श्री. संपतराव पाटील यांनी पथकासह सदर ठिकाणच्या पत्त्यावर बोगस गि-हाईक पाठवुन छापा टाकला. तेव्हा तेथे वेश्या दलाल महिला वय-२७ वर्षे, रा. म्हाडा बिल्डींग, मिरारोड पुर्व, मुळ रा. राज्य मध्यप्रदेश हिला ताब्यात घेवुन, १६ वर्षीय अल्पवयीन पिडीत मुलीची सुटका केली.सदरची महिला आरोपीने आल्पवयीन मुलीचे कौमार्यभंग करण्याकरीता १,००,०००/- रुपये ठरवुन ते स्वीकारल्याने आरोपी विरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ७१/२०२१ भादविसं कलम ३६६ (अ), ३७० सह अने. प्रतिबंध कायदा १९५६ कलम ४,५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.सदरची कारवाई

डॉ. महेश पाटील, पोलीस उपायुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईदरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संपतराव पाटील, सहायक पोलीस निरीक्षक श्री. देविदास हंडोर, आणि पथक यांनी केली

## मीरा भाईंदरमध्ये भर वस्तीमध्ये बंदुकीचा धाक दाखवून केले लूट नवघर पोलिसांनी अवघ्या काही दिवसात जेरबंद केला आरोपी




नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १४१/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३९२ सह आर्म अक्ट ३, २५ प्रमाणे दि. ०१.०३.२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील आरोपीने बंदुकीचा धाक दाखवुन फिर्यादी यांचे "रविना गोल्ड" नावाचे दुकान, नवघर रोड, भाईंदर पुर्व येथुन दि. ०१,०३.२०२१ रोजी १) ०१,७०,०००/रु. रोख रक्कम, २) १५,७५,०००/ रु. किं.चे ४५० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या लगड, रु ) ४,०००/ रु.कि.चा सॅमसंग जे २ कंपनीचा मोबाईल फोन असा एकुण १७,४९,०००/ रु. या मुद्देमाल योद्धे करुन नेला होता. सदर गुन्हयातील आरोपी हा व्यवसायाने चांदीचा व्यवसाय करणारा असून त्याने भाईदर पुर्व परिसरात फिर्यादी यांचे दुकानावर पाळत ठेवुन चोरीचे उद्देशाने नमुद गुन्हा केला आहे. नमुद गुन्हा झाल्यावर भाईंदर पुर्व परिसरात सोन व चांदी व्यापारी यांचेत दहशत निर्माण झाली होती. सदरचा गुन्हा हा बंदुकीचा धाक दाखवुन जबरी चोरीचा समाजात दहशत निर्माण होईल असा गंभिर ...पान २ वर...

## पोलीस असल्याचे भासवुन राष्ट्रीय महामार्गावर दरोडा टाकणाऱ्या टोळीला गुन्हे शाखा कक्ष-3 विरार यांनी केले जेरबंद



वरिष्टांकडून मिळालेल्या माहितीनुसार मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वसई येथील काठीयावाड या हॉटेल जवळ फिर्यादी हे कोविड साथीच्या अनुषंगाने कोविड साहित्य खरेदी करण्याकरीता आले असता एका पांढऱ्या रंगाच्या स्कार्पिओ गाडीमधून आलेल्या इसमा पैकी तीन साध्या वेषातील व दोन खाकी गणवेश धारण केलेल्या लोकांनी फिर्यादी व साक्षीदार यांना वेअर हाऊसला घेवुन जाण्याच्या बहाण्याने गाडीमध्ये जबरदस्ती बसवुन वेअर हाऊस येथे न नेता त्यांना गाडी मध्ये शिवीगाळी करून बोलण्यात गुंतवुन गाडीमध्ये असलेल्या लाकडी दांडके व ठोश्याबुक्याने मारहाण करून जबरदस्तीने फिर्यादी यांचे जवळील २५००,००००/- रुपये रोख रक्कम असा मुद्देमाल दरोडा टाकुन घेवुन गेले बाबत फिर्यादी वय २७ वर्ष, रा. मुंबई यांनी दिलेल्या तक्रार वालीव पोलीस ठाणे येथे दाखल केली त्यावरून वालीव पोलीस ठाणे येथे गु.र.नं. 1 २२३/२०२१ भां.द.वि.स.कलम- ३९५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात करण्यात आला.सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष-३ विरार पथकानी तांत्रीक व गुप्त बातमीदार गुन्हेगारांची ...पान २ वर...

## मिरारोड हुक्का पार्लरवर पोलीस आयुक्तांनी टाकला छापा; मॅनेजरसहित कर्मचाऱ्यांना अटक



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दिनांक ०३/०३/२०२१ रोजी श्री.अमित काळे, पोलीस आयुक्त परिमंडळ-१ यांना माहिती मिळाली की, मिरारोड पुर्व, शितलनगर येथील रश्मीपार्क बिल्डींगमध्ये तळमजल्यावरील शिशा लॉन्ज हुक्का पार्लरमध्ये ग्राहकांना हर्बल हुक्क्याच्या नावाखाली महाराष्ट्र शासनाकडुन प्रतिबंधीत केलेला तंबाख्नुजन्य हुक्का अवैधरित्या ओढण्यासाठी उपलब्ध करुन देत आहेत.सदर बातमीची खात्री करून पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांचे पथकानी मिळालेल्या माहीतीच्या आधारे शिशा लॉन्ज हुक्का पार्लरमध्ये रात्री पंचासह छापा घातला. सदर ठिकाणी शिशा लॉन्ज हुक्का पार्लरचे चालक, मॅनेजर व हॉटेलचे कर्मचारी यांनी स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता सार्वजनिक ठिकाणी हुक्का पार्लरमधील ग्राहकांना तंबाख्नु जन्य हुक्का ओढण्या-पिण्यासाठी उपलब्ध करून ग्राहकांच्या टेबलावर हुक्क्याचे काचेचे पॉट व त्यावर फिल्टरमध्ये जळता कोळसा ठेवुन मानवी जीवन धोक्यात येईल असे हयगयीचे कृत्य केले तसेच कोरोना या महामारीच्या रोगाचे पार्श्वभुमिवर कंडीशनल लॉकडाऊनच्या कालावधीत शासन, जिल्हाधिकारी, महानगरपालिका यांनी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करुन हर्बल हुक्का पार्लरच्या आड बेकायदेशिर तंबाखूयुक्त हुक्कापार्लर चालविले. तसेच हुक्का पार्लरमधील ग्राहक हे त्या ठिकाणी प्रतिबंधीत तंबाख्नुजन्य हुक्का पित/ओढत असताना मिळुन आले.

घटनास्थळी मिळुन आलेले २०,२१० रुपयाचा बेकायदेशीर हक्का पार्लरचा मुद्देमाल जप्त करुन हुक्का पार्लर चालक/मालक, मॅनेजर, वेटर असे ७ व ११ ग्राहकांविरुध्द मिरारोड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नंबर । ८३ /२०२१ भादंवि कलम १८८, २६९, २७०, २७२, २८५, ३३६, ३४ सह कोप्टा ॲक्ट कलम ४, २१, साथरोग प्रतिबंध अधिनियम २, ३, ४ प्रमाणे अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे.सदरची कारवाई श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- ०१ मिरारोड, सपोनि/ दत्तुसाहेब लोंढे, सफो. विनायक मगर,आणि पथक यांनी केली आहे.

## अल्पवयीन मुलीची छेड; पीडितेची आई, काकाने केलेल्या मारहाणीत आरोपीचा मृत्यू



छतरपूर: मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्यात एक खळबळजनक घटना घडली आहे. एका अल्पवयीन मुलीची छेड काढल्याने पीडितेच्या आईने आणि काकाने आरोपीला बेदम मारहाण केली. यात त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच, पोलीस तेथे पोहोचले. त्यांनी आरोपीला ताब्यात घेऊन तात्काळ रुग्णालयात दाखल केले. तिथे त्याचा मृत्यू झाला. छतरपूर जिल्ह्यातील ओरछा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खांदिया गावात ही घटना घडली. हेतराम कुशवाहा असे मृताचे नाव आहे. त्याने गावातीलच अल्पवयीन मुलीची घरात घुसून छेड काढल्याचा त्याच्यावर आरोप होता. त्यावरून पीडितेच्या आईने आणि काकाने त्याला बेदम मारहाण केली होती.मिळालेल्या माहितीनुसार, या घटनेनंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी गंभीर जखमी झालेल्या हेतराम याला जिल्हा रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले.

## मालेगावात सक्तीने धर्मांतराचा प्रकार?; मुलीच्या आईची पोलिसात लेखी तक्रार

मालेगाव, शहरातील द्याने परिसरातील एका हिंदू मुलीचे बळजबरीने व बेकायदेशीरपणे धर्मांतर करून मुस्लिम युवकाशी विवाह लावून दिल्याचा आरोप होत आहे. मुलीच्या आईने याबाबत अपर पोलिस अधीक्षक चंद्रकांत खांडवी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याची मागणीही तक्रारीत करण्यात आली आहे.

मुलीचे कुटुंबीय दशरथवाडी (ता. कोपरगाव) येथे वास्तव्यास आहेत. तिच्या आईने पोलिसांकडे केलेल्या लेखी तक्रारीत संशयित शेख सद्दाम शेख (वय २८ रा. द्याने), अब्दुल माबुद अन्सारी (वय २८ रा. नूरबाग) व जाफर अली आझाद अहमद (वय २६, रा. द्याने) यांच्यासह शहर काजी मालेगाव व नोटरी यांनी बळजबरीने दस्तावेज तयार करून धर्मांतर करण्यास भाग पडल्याचे म्हटले आहे. सन २०१८ पासून पीडित मुलगी द्याने येथील मामाकडे शिक्षणासाठी होती. त्यावेळी तिचे वय १६ वर्षे होते. ती शिक्षण घेत असताना आरोपी सद्दाम तिच्यावर लैंगिक अत्याचार केले व तिला जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याने मुलगी बोलू शकली नाही. त्यांनतर वारंवार आरोपी सद्दाम, अब्दुल व जाफर यांनी तिचा छळ केला. बेकायदेशीररित्या तिचे धर्मांतर केले. तसेच, सद्दाम हिच्यासोबत संशयित अब्दुल, जाफर व मालेगाव शहर काजी यांनी निकाह लावून दिला. मुस्लिम निकाहनामाची नोटरी करताना त्यात निकाहची तारीख नमूद केली नाही. मुलगी सज्ञान झाल्यावर मार्च २०२१ मध्ये तिचा निकाह लावून दिल्याने संबंधितांवर बाल लैंगिक अत्याचार कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल





करावा. शहर काजी व नोटरी ॲड आर. डी. खैरनार यांनी किती बेकायदेशीर धर्मांतरणाबाबत दस्त बनवले त्याची चौकशी करून दोषींना अटक करावी, अशी मागणी मुलीच्या आईने लेखी तक्रारीत केली आहे.

धर्मांतर झाल्याची तक्रार पीडितेच्या आईने शनिवारी (दि. ६) सायंकाळी केली. दरम्यान पीडित मुलगी व आरोपी सद्दाम हे शनिवारीच रमजानपुरा पोलिस ठाण्यात स्वतःहून हजर झाले होते. त्यांनी मुस्लिम निकाहनामाचे नोटरी कागदपत्रे पोलिसांना दाखवून या विवाहास दोघांची संमती असल्याचे पोलिसांना सांगितले.

## भाजप कार्यकर्त्यावर झाडल्या गोळ्या, पश्चिम बंगालमधील घटना; तृणमूलवर आरोप

नादिया: पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकांचे वातावरण तापले असून, भाजप आणि तृणमूल काँग्रेसमध्ये हिंसक घटनांवरून आरोप-प्रत्यारोप सुरूच आहेत. आता राज्यातील नादिया जिल्ह्यात भाजपच्या स्थानिक नेत्यावर गोळ्या झाडल्याची घटना घडली आहे. हरिंगाटा परिसरात ३२ वर्षीय स्थानिक भाजप नेत्यावर गोळीबार केला. यात तो जखमी झाला आहे. भाजपच्या कार्यकर्त्यांनी या घटनेनंतर तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांवर आरोप केला आहे.

गस्ती घालत असताना पोलीस कर्मचाऱ्यांना संजय दास हा कपिलेश्वर संतोषपूर येथील एका चहाच्या टपरीजवळ जखमी अवस्थेत दिसला. त्यांनी तातडीने त्याला रुग्णालयात दाखल केले. हरिंगटा नगरपालिकेच्या वॉर्ड क्रमांक १०मधील भाजप बूथ अध्यक्ष संजय दास याच्यावर गोळ्या झाडल्या होत्या. यात तो जखमी झाला आहे. आता त्याची प्रकृती ठीक आहे.





या हल्ल्यामागे तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते असल्याचा आरोप भाजपने केला आहे. मात्र, तृणमूलच्या कार्यकर्त्यांनी आरोप फेटाळले आहेत.

दोन गटांमध्ये झालेल्या वादातून हा हल्ला झाला आहे, ते भाजपशी संबंधित असल्याचे तृणमूलचे म्हणणे आहे. पोलीस अधिक्षकांनी सांगितले की, पोलीस कर्मचारी गस्तीवर होते. रविवारी मध्यरात्री अडीच वाजताच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग १२ जवळील एका चहाच्या टपरीजवळ त्यांनी वाहन थांबवले. तेथूनच थोड्या अंतरावर काही जण बसलेले होते.

पोलीस कर्मचारी तिथे पोहोचताच, त्या लोकांनी तेथून पळ काढला. एक व्यक्ती रक्ताच्या थारोळ्यात तिथे पडली होती. एका गटातील व्यक्तीने त्याच्यावर गोळ्या झाडल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. संजय दासच्या वडिलांनी रविवारी संध्याकाळी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. राजकीय वादातून माझ्या मुलावर गोळ्या झाडल्याचे त्याच्या वडिलांनी तक्रारीत म्हटले आहे.

## महिलेवर पोलीस ठाण्याच्या आवारात बलात्कार करणारा पोलीस सब इन्स्पेक्टर बडतर्फ

अलवर: राज्यातील अलवर जिल्ह्यात खेडली पोलीस ठाण्याच्या परिसरात महिलेवर बलात्कार करणाऱ्या पोलीस उपनिरीक्षकाला बडतर्फ करण्यात आले आहे. पतीविरोधात तक्रार करण्यासाठी पीडित महिला खेडली पोलीस ठाण्यात आली होती. हे प्रकरण मिटवण्याचा बहाणा करून महिलेवर पोलीस उपनिरीक्षक भरत सिंह याने तिच्यावर सलग तीन दिवस बलात्कार केला होता.



या घटनेनंतर आता अलवर पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली आहे. या प्रकरणात पोलिसांनी चार कर्मचाऱ्यांवरही कारवाई केली आहे. हेड कॉन्स्टेबलने महिलेने दिलेल्या तक्रारीच्या कागदपत्रांत फेरफार केले होते, असे तपासात स्पष्ट झाले आहे.

पोलीस सूत्रांनुसार, बलात्कार प्रकरणातील आरोपी पोलीस उपनिरीक्षकाला सोमवारी कठुमर कोर्टात हजर करण्यात आले. दुसरीकडे या प्रकरणाचा तपास राजगढ येथील सीओ अंजली जोरवाल यांच्याकडे सोपवला आहे. रविवारी खेडली पोलीस ठाण्यात २६ वर्षीय महिलेवर बलात्कार केल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. पीडित महिलेवर पोलीस उपनिरीक्षकानेच बलात्कार केला होता.

ती महिला आपल्या पतीविरोधात तक्रार करण्यासाठी पोलीस ठाण्यात आली होती. पोलिसांनी मध्यस्थी करून हे प्रकरण मिटवावे आणि पती आणि सासरच्या मंडळींची समजूत काढावी, या अपेक्षेने ती पोलीस ठाण्यात आली होती. मात्र, पोलीस उपनिरीक्षक भरत सिंह याने २ मार्चपासून सलग तीन दिवस तिच्यावर बलात्कार केला. रविवारी त्याने पुन्हा तिच्यावर बलात्काराचा प्रयत्न केला. महिलेने विरोध केला. त्यानंतर पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात तक्रार दाखल केली.

पोलीस अधीक्षक तेजस्वीनी गौतम यांनी सांगितले की, महिलेवरील बलात्कार प्रकरणात आरोपी पोलीस उपनिरीक्षक भरत सिंह याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. त्याच्या बडतर्फीचे आदेश दिले आहेत.

महिलेने दाखल केलेल्या तक्रारीच्या कागदपत्रांमध्ये फेरफार करणाऱ्या पोलीस कॉन्स्टेबललाही निलंबित केले आहे.

आतापर्यंत चार पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## विनयभंगप्रकरणी तीन आरोपी अटकेत

औरंगाबाद, कोचींग क्लासेसहून आपल्या घरी चाललेल्या एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या तीन जणांना पुंडलिकनगर पोलिसांनी अटक केली. ऋषीकेश पालोदकर (२२, रा. पुंडलिकनगर), शुभम सुरेश मोरे (२२, रा. रेणुकानगर) आणि रुपेश घोडके (१९, रा. सूत गिरणी चौक) अशी अटक केलेल्या युवकांची दाखवून पळ काढला होता. या प्रकरणी पुंडलिक नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हा गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिस ऋषिकेश पालोदकर आणि त्याच्या साथीदारांचा शोध घेत होते. पोलिसांना हे आरोपी खुलताबाद येथे असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी खुलताबाद येथून तिघांना अटक केली.



नावे आहेत. ऋषीकेश पालोदकर आणि त्याचे साथीदार दहा ते बारा दिवसांपासून गजानन नगर भागात राहणाऱ्या १५ वर्षीय विद्यार्थिनीचा पाठलाग करित होते. दोन मार्च रोजी ही मुलगी मैत्रिणीसोबत घरी येत असताना, तिला पालोदकरने अडवत विनयभंग केला. मुलीने आरडाओरड केल्यानंतर त्या मुलीचे वडील व मामा धावून आले. त्यावेळी पालोदकरने चाकूचा धाक ऋषीकेश पालोदकर हा रेकॉर्डवरील आरोपी आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक घनश्याम सोनवणे, पोलिस उपनिरीक्षक धनंजय आढाव, विठ्ठल घोडके, रमेश सांगळे, बाळाराम चौरे, शिवाजी गायकवाड, दीपक जाधव, रवी जाधव, अजय कांबळे, राजेश यदमळ, प्रवीण मुळे यांनी ही कारवाई केली.

## सहा महिन्यांत 237 गुन्हेगार गजांआड

पुणे, महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहर पोलिसांनी गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केली आहे. गुन्हेगारी टोळ्यांना गजांआड करण्याबरोबरच पैशांसाठी गंभीर गुन्हे करणाऱ्या सराईतांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा (मोक्का), 'एमपीडीए'; तसेच तडीपारीची कारवाई करून गेल्या सहा महिन्यांत तब्बल २३७ रेकॉर्डवरील गुन्हेगार गजांआड झाले आहेत.

सोनसाखळी चोरी, जबरी चोरी; तसेच गुन्हेगारी टोळ्यांसह जमिनी लुटण्यासाठी सक्रिय असणाऱ्या गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्यात आली आहे. महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका वर्षभरानंतर होणार आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी सराईतांना गजाआड करण्यासाठी मोहीम हाती घेतली आहे.

शहरातील रस्तोरस्ती होणारे गुन्हे वाढले असून, प्रमुख गुन्हेगारी टोळ्यांचे म्होरके तुरुंगातून सुटल्याने पुन्हा टोळीयुद्ध पेटण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या



पार्श्वभूमीवर 'महाराष्ट्र टाइम्स'ने शहरातील कायदा सुव्यवस्थेवर बोट ठेवल्यानंतर पोलिसांनी गुन्हेगारांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाईची धार अधिक तीव्र केली आहे. गेल्या दोन महिन्यांत सात गुन्हेगारी टोळ्यांविरुद्ध 'मोक्का'अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी गेल्या सहा महिन्यांत प्रतिबंधात्मक कारवाईला वेग दिल्याने त्याचे परिणाम दिसू लागले आहेत.

करोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर शहरात सराईत गुन्हेगारांनी डोकेवर काढले होते. घरफोड्या, सोनसाखळी चोऱ्यांसह इतर गुन्हे वाढू लागले होते; तसेच वाहनांची तोडफोड, जाळपोळ करण्याच्या घटना घडू लागल्या होत्या. त्यातच टोळ्यांचे प्रमुख गजा मारणे, नीलेश घायवळ, गणेश मारणे जामिनावर सुटून तुरुंगातून बाहेर आल्यामुळे पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे. त्यामुळे पोलिसांनी कुख्यात गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करून वचक ठेवण्यास सुरुवात केली आहे. घायवळला शहरातून तडीपार करण्यात आले आहे, तर मारणेने कारागृहातून सुटल्यानंतर मिरवणूक काढली होती. त्याच्यावरही वेगवेगळ्या पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल करून त्याच्या नाड्या आवळण्यास सुरुवात झाली आहे.

## पृष्ठ १ वरुन

### रेल्वेने बंद केले सर्व

अडचणींसाठी केवळ एकच नंबर जारी केला आहे. जेणेकरुन अनेक नंबर लक्षात ठेवावे लागू नयेत. त्यामुळे आता कोणतीही समस्या, तक्रार असल्यास एकाच नंबरवर कॉल करावा लागेल. रेल्वे मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, आता कोणत्याही चौकशी, तक्रार, मदतीसाठी एकच हेल्पलाईन नंबर 139 हा असेल. प्रवाशांना अनेक नंबर लक्षात ठेवावे लागू नयेत तसंच एकच नंबर लक्षात ठेवणं सोपं आणि फायदेशीर ठरावं यासाठी रेल्वेकडून हा निर्णय घेण्यात आला आहे.जुने नंबर बंद - ट्विट करत रेल्वे मंत्रालयाने सांगितलं की, 139 नंबरवर सर्व सेवा मर्ज केल्यामुळे आता इतर सर्व नंबर बंद करण्यात आले आहेत. आधीचे 182 ,138 हे हेल्पलाईन नंबर होते, ते आता बंद करण्यात आले. नव्या 139 क्रमांकावर प्रवाशांना 12 भाषांमध्ये माहिती मिळू शकेल. 139 या हेल्पलाईन क्रमांकावर प्रवाशांना Passenger Name Record अर्थात पीएनआर, ट्रेनची स्थिती, SMS वरुन ट्रेनची माहिती, ट्रेनमधील सीटची उपलब्धता, तिकिट कॅन्सल करणं यासारख्या सर्व सुविधा या एका क्रमांकावर मिळू शकतील. 139 क्रमांकावर नऊ पर्याय असतील.

1 नंबर - दाबल्यानंतर सुरक्षा आणि इमरजेन्सीबाबत तक्रार

2 क्रमांकावर चौकशी - पीएनआर, भाडे, तिकिट बुकिंगसंबंधी माहिती

3 क्रमांक - कॅटरिंगसंबंधी तक्रारीसाठी

4 क्रमांक - सामन्य तक्रार 5 क्रमांकावर - सतर्कता आणि भ्रष्टाचारसंबंधी तक्रार 6 क्रमांकावर - ट्रेन दुर्घटनेसंबंधी तक्रार 9 क्रमांकाच्या - मदतीने आधी केलेल्या तक्रारीच्या स्थितीची माहिती घेता येईल.

तसंच हॅश # दाबून कॉल सेंटर अधिकाऱ्याशी संपर्क साधता येईल.

### मुंबईत कोरोना धोका

मुंबईतल्या कोरोनाच्या हॉटस्पॉटची आकडेवारी बघितली तर लक्षात येतं की मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम हा सगळ्यात बाधित आणि सगळ्यात जास्त रुग्ण वाढीचा दर असलेला वॉर्ड आहे. अंधेरीतल्या अनेक उच्चभ्रू वस्त्यांमध्ये कोरोनाग्रस्तांची संख्या वाढते आहे. यामुळेच शहराची Covid-19 ची आकडेवारी धक्कादायक पातळीवर पोहोचली आहे. अंधेरी भागात रुग्णवाढीचा दर सर्वाधिक आहे. दररोज सरासरी 92 नवे कोरोना रुग्ण या उपनगरात सापडत आहेत. उच्चभ्रू लोखंडवालामधील रहेजा क्लासिक या इमारतीत महापालिकेच्या नोंदीनुसार, सध्या 11 जण कोरोनाचे रुग्ण आहेत. तरीही इथले दैनंदिन व्यवहार, ये-जा सुरळीत सुरू असल्याचं दिसतं. वास्तविक मुंबई महापालिकेच्या कोविड नियमानुसार इमारतीत पाचपेक्षा अधिक रुग्ण आढळल्यास ती सील करण्यात येते. पण या इमारतीत असं झालेलं दिसत नाही. तीच गोष्ट जुहु चौपाटीची. चौपाटीवरही लोकांची गर्दी आहे. मास्क न घालता वावरणारे अनेक जण इथे दिसतात. इथे येणारे नागरिक अनेकदा दंड भरण्याऐवजी क्लीन अप मार्शलनाच ओरडतात, असाही अनुभव इथले कर्मचारी सांगतात. अंधेरी भागात असणाऱ्या हॉटेल्स, पब्समध्ये सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळले जात नाहीत. इथली गर्दीसुद्धा कोरोनाचा फैलाव वाढवायला कारणीभूत ठरणारी आहे. रुग्णवाढीचा भयावह दर अंधेरी पश्चिम याचा दर आठवड्याचा रुग्ण वाढीचा दर हा 0.42 %इतका आहे. मागच्या आठवडाभरात जवळपास साडे सहाशे करोना रुग्णांची वाढ या वॉर्डात नोंदवण्यात आली आहे. याचा अर्थ दर दिवसाला सरासरी 92 नवे करोनाबाधितांची नोंद या वॉर्डात झाली आहे. 27 फेब्रुवारी च्या आकडेवारीनुसार आतापर्यंत एकूण 21 हजार 660 इतकी रुग्ण संख्या या वॉर्डात होती. जी 6 मार्च आकडेवारीनुसार 22,302 झाली आहे. 28 फेब्रुवारीला 87नवे करोनारुग्ण बाधित झाले, जे वाढून तीन मार्चला 96 चार मार्चला 107 तर 5 मार्चला 119 आणि सहा मार्चला 97 इतकी मोठ्या प्रमाणात वाढली. अंधेरी पश्चिम येथील सध्या 30 इमारती पण सील केल्या गेल्या आहेत. इमारती सील करण्याच्या पद्धतीत मागच्या काही दिवसात बदल करण्यात आला आहे. पाच पेक्षा अधिक रुग्ण जर त्या इमारतीत सापडले तर त्या इमारतीला सील केलं जातं किंवा पाचपेक्षा कमी रुग्ण सापडले तर त्या इमारतीचा तो बाधित रुग्ण सापडलेला फक्त मजला सील केला जातो. या वॉर्डाचे सहाय्यक आयुक्त विश्वास मोटे यांच्या मते 'इथे हॉटेल्स आणि पबची संख्या जास्त आहे. लोकांचं साशालायझिंग जास्त आहे. यामुळे कोरोनाचा प्रसार वाढतोय. सध्या उच्चभ्रू वस्तीत कोरोनाचे रुग्ण वाढत आहेत. मोटे यांनी सांगितलं, "जसं झोपडपट्टी किंवा चाळींमध्ये लोकांचं सहकार्य मिळालं तसं सहकार्य या टोलेजंग इमारतीत अनेकदा मिळत नाही. आम्ही 11 सेंटर्सवर मोफत कोरोना चाचण्या सुरू केल्या आहेत. RTPCR सोय असली तरी लोक तिथपर्यंत पोहोचतच नाहीत. आम्ही मास्क न घालणाऱ्यांवर कारवाई मोठ्या प्रामाणात सुरू केली आहे. 7 मार्चला एका दिवसात साडतीन हजार लोकांकडून साडे सहालाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. पण कोरोनासारख्या आजाराशी दोन हात करायचे असतील तर लोकांच्या सहकार्याशिवाय हे शक्य नाही." बांद्र्यातही कहर अंधेरी पश्चिम पाठोपाठ मुंबईतील करोनाचा हॉटस्पॉट ठरला आहे तो एच पश्चिम म्हणजेच बांद्रा पश्चिम हा वॉर्ड. जिथे सध्या रुग्ण वाढीचा दर हा 0.41 टक्के इतका आहे. त्या नंतर एफ उत्तर म्हणजेच माटुंगा तिसऱ्या क्रमांकावर आहे. तर रुग्णवाढीबाबत मुलुंड हा वॉर्ड चौथ्या क्रमांकावर, एम पश्चिम - चेंबूर पश्चिम हे पाचव्या तर चेंबूर ईस्ट हे या बाबतीत सहाव्या क्रमांकावर आहे.

### मीरा भाईंदरमध्ये भर वस्तीमध्ये

स्वरुपाचा असल्याने तो लवकरात लवकर उघडकीस आणन्याकरीता नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरन पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा भाईंदर, मिरारोड, वसई, व नालासोपारा येथे जावुन परिसरातील संपुर्ण सीसीटिव्ही यंत्रणेच्या आधारे गुन्हयाचा तांत्रीक तपास केला तसेच आरोपीने नवघर, मिरारोड, वसई व नालासोपारा याठिकाणी वापरलेल्या विविध अटो रिक्षाड्रायव्हर ने आरोपीचे मार्गाबाबत व ठावठिकाणाबाबत दिलेल्या माहितीचे आधारे आरोपीला अटक करण्यात आली आहे. तपासादरम्यान रु. ०१ ७० ०००/ रोख रक्कम .1 ४५० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या लगड किंमत रु. १५ ७५ ०००/ असा - रु. १७ ४५ ०००/ किंमतीचा '६' हस्तगत करण्यात आलेला आहे.तसेच गुन्हयातील वापरलेली बंदुक सुध्दा हस्तगत करण्यात आळी आहे. गुन्हयात हस्तगत केलेली बंदुक ही एअर गन आहे असे तपासात निष्पन्न झाले आहे. सदरची कामगिरी श्री. सदानंद दाते., मा. पोलीस आयुक्त .,मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय, श्री. मा. एस.जयकुमार, अपर पोलीस आयुक्त, श्री, अमीत काळे, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ.शशीकांत भोसले, मा.सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग, श्री. मिलिद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/भास्कर पुल्ली, सपोनि/योगेश काळे, पोउनि/संदिप ओहळ, पोना/१४१८ रविंद्र भालेराव, पोना/२४८८ प्रशांत वाघ, पोशि/३३५९ निलेश शिंदे, पोशि/२८३८युनुस गिरगांवकर, पोशि/३४५८ संदिप जाधव यांनी केला आहे.

### नाला सोपारा येथे

४० पोलीस अमंलदार, ०९ म.पो.अमंलदार, ०५ वा.शा. यांचे अमंलदार, ०१ आर.सी.पी प्लॉटुन व ०१ एस.आर.पी.एफ प्लादुन हजर होते. २) तुळींज पोलीस ठाणे हद्दित अनधिकृत वास्तव्य करणारे परकीय नागरीक तसेच अनधिकृत हाटेल असलेले वेदांत अपार्टमेंट, हायटेंशन रोड, नालासोपारा (पुर्व) येथिल अनधिकृत ४ शॉप व बसेरा मॉडर्न अपार्टमेंट,मधील अनधिकृत १ रुम यावर दिनांक ०५/०३/२०२१ रोजी महानगरपालिका आणि तुळींज पोलीस ठाणे यांनी संयुक्त कारवाई केली आहे. मागील काही दिवसांमध्ये मि भा,व वि आयुक्तालयाचे हहीमध्ये ज्या-ज्या गंभीर गुन्हयांच्या घटना घडल्या होत्या ते सर्वच्या सर्व गुन्हे पोलीसांनी उघडकीस आणुन सर्व आरोपीतांना जेलबंद केले आहे व त्यांचेवर योग्यती प्रतिबंध कारवाई करण्यात येत आहे. मि भा,व वि पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी गुन्हे शाखेचे मध्यवर्ती क्राईम युनिट सह इतर चार क्राईम युनिट, तसेच खंडणी विरोधी पथक स्थापन करण्यात आलेले आहे. तसेच अंमली पदार्थ विरोधी पथक कार्यान्वीत करुन आंमली पदार्थाचे सेवन व विक्री करणाऱ्या गुन्हेगारांविरुध्धद धडक कारवाई करुन मागिल दोन महिन्यात सुमारे ५० लाखाचे आंमली पदार्थ जप्त केले आहेत. सदर मोहिमेमध्ये जनतेचे मोलाचे सहकार्य मिळत आहे. पोलीसांचे आवहानाला प्रतिसाद देवुन नागरिकांनी आप आपल्या परीसरामध्ये लावलेल्या सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्यामुळे अनेक गंभीर गुन्हयातील आरोपीतांना अटक करणे पोलीसांना शक्य झाले आहे. मि भा,व वि पोलीस नागरिकांना आवहान करित आहेत की, पोलीसांना गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी, गुन्हे उघडकीस आणणेसाठी यापुढीही असेच सहकार्य करावे.

### पोलीस असल्याचे भासवुन राष्ट्रीय

गुन्हे करण्याची पद्धत यांचा सखोल व कौशल्यपुर्वक तपास करुन सदर गुन्हयामध्ये आरोपी निष्पन्न करुन आरोपी १) पार्थ जातिन्द्र जानी, वय- २६ वर्षे, २) रब्बानी मेहबुब परेल, वय-२८ वर्ष, ३) अब्दुल हमिद अहमद सैय्यद, वय-३५ वर्षे, ४) गिरिश श्रीचंद वालेचा ऊर्फ मनोहरलाल पटेल, वय २७ वर्षे, ५) इम्रान अहमद शेय, वय-३८ वर्ष, ६) स्मितेश सुभाष गवस, वय ३७ वर्षे. ७) सुरेश गुणाजी दळवी, वय-३३ वर्षे, ८) संतोष गोविंद मोरे, वय-४६ वर्षे, ९) विनय संतोष सिंग, वय ४१ वर्षे, सर्व रा. ठाणे यांना ताब्यात घेवुन अटक करण्यात आली. सदर गुन्हयाचा अधिक तपास वालीव पोलीस करीत आहेत. सदरची कामगिरी श्री. डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पो.नि/प्रमोद बडाख, सपोनि/ संतोष गुर्जर, सपोनि/ कुटे, पो.उपनिरी/ शिवाजी खाडे, पोउपनिरी/ हितेंद्र विचारे, सफो/ अनिल वेळे, आणि पथक यांनी केली आहे.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार ०९ ते १५ मार्च २०२१



## संपादकीय...

# ‘बाबूं’च्या डोळ्यांतील कुसळ..

गत सप्ताहातील अनेक घटनांच्या भाऊगर्दीत एक महत्त्वाचा विषय पूर्ण दुर्लक्षिला गेला. तो विषय म्हणजे दूरसंचार क्षेत्रातील स्पेक्ट्रम ऑक्शन. म्हणजे ध्वनिवर्णपटाचा लिलाव. तो दूरसंचार क्षेत्राच्या नियामकाकडून केला जातो. यात मोबाइल दूरध्वनी सेवा पुरवणाऱ्या कंपन्या बोली लावतात आणि त्याद्वारे विकत घेतलेल्या ध्वनिवर्णपटात ग्राहकांना आपापली सेवा पुरवतात. याच्या तांत्रिकतेत जाण्याची गरज नाही. कारण विषय त्या ध्वनिवर्णपटाच्या तंत्र-तपशिलाचा नाही, तर त्याच्या विक्रीचा आहे. अन्य कोणत्याही उपभोग्य वस्तूप्रमाणे त्याची नैमित्तिक विक्री होत असते. या ताज्या लिलावातून भारत सरकारच्या



तिजोरीत भरभक्कम ७७,८१५ कोटी रुपये जमा झाले. सरकारी तिजोरीची सध्याची खंक अवस्था लक्षात घेता ही रक्कम लक्षणीय ठरते. त्यामुळे सरकारी पातळीवर या यशाचे गोडवे गायले गेले आणि समाजमाध्यम आदींतील स्तुतिपाठकांनी कवतिकाचे आणखी एक कवन रचले. या लिलावामागील वास्तवाशी अनेक अपरिचित असल्याने असे झाले असावे. वास्तविक मोबाइल फोनने आपले आयुष्य आता इतके व्यापलेले असताना इतक्या महत्त्वाच्या विषयाकडे दुर्लक्ष होणे अयोग्य. म्हणून सदर लिलाव आणि तत्संबंधी घडामोडींचा परामर्श घेणे आवश्यक ठरते. वरवर पाहता या लिलावाद्वारे जमा झालेली रक्कम बख्खळ असल्याचे अनेकांना वाटू शकते. ते तसे वाटलेही. पण पंचाईत ही की, प्रत्यक्षात ही रक्कम निर्धारित लक्ष्याच्या जेमतेम एक पंचमांश इतकीच आहे. या लिलावातून सरकारला ३,९२,००० कोटी अपेक्षित होते. प्रत्यक्षात ७७,८१५ कोटी मिळाले. यातील महत्त्वाचा मुद्दा असा की, अपेक्षापूर्ती अजिबात करू न शकलेला हा काही आपला पहिला ध्वनिवर्णपट लिलाव नाही. म्हणजे या अपेक्षाभंगाचा दोष विद्यमान सरकारच्या एकटय़ाच्या माथी मारता येणार नाही. कारण २०१२ पासूनच अशा आपल्या सर्व लिलावांनी देशाचा दणदणीत अपेक्षाभंग केलेला आहे. लिलाव ही जरी प्रत्यक्ष प्रतिक्रिया द्यावी अशी घटना असली तरी ती सरकारी धोरणाची अंतिम परिणती असते. म्हणजे सरकारी धोरणात जर काही खोट असेल तर तिचे प्रतिबिंब या अशा लिलावातही पडणार. आपले दुखणे नेमके हेच आहे. कारण सरकार बदलले तरी दूरसंचार क्षेत्रातील रोगट धोरणांत अजिबात फरक पडलेला नाही. आधीच्या २०१२ सालच्या अशा लिलावातून चक्क ६७ टक्के ध्वनिवर्णपट विकलाच गेला नाही. त्यानंतर पुढच्याच वर्षीच्या पुढच्या लिलावात हे न विकल्या गेलेल्या ध्वनिवर्णपटाचे प्रमाण थेट ८५ टक्क्यांवर गेले. आताचा लिलावही तसाच. तोही आधीच्या लिलावांप्रमाणे तोंडावर आपटला. याला कारण आपल्या दूरसंचार नियामकाची धोरणे.

ती या लिलावांच्या इतिहासातून समजून घेता येतील. २०१० साली ‘३जी’ तंत्रज्ञानाचा पहिला मोठा लिलाव झाला. ही मोठी घटना होती आणि तिची रास्त हवा करण्यात सरकारी पातळीवर यश आले होते. या ‘३जी’मुळे दूरसंचाराचा वेग झपाटय़ाने वाढणार होता. म्हणजे कोळशाच्या इंजिनावर चालणाऱ्या वाहनात पेट्रोलच्या इंजिनाने जो फरक पडेल तो येथे पडणार होता. तरीही याबाबत सरकारची दिल्ली आणि मुंबई परिमंडळासाठी प्रति मेगाहर्ट्झ राखीव किंमत होती फक्त ६४ कोटी रुपये. प्रत्यक्षात दिल्लीसाठी लिलावातून मिळाले प्रति मेगाहर्ट्झ ६६३ कोटी आणि मुंबईसाठी ६४९ कोटी रुपये. या यशाने भारून दूरसंचार नियामकाने पुढच्या लिलावात दिल्लीसाठीच्या राखीव रकमेत प्रचंड वाढ करून किंमत ७१७ कोटी रु. आणि मुंबईसाठी ७०२ कोटी रु. प्रति मेगाहर्ट्झ इतक्या पातळीवर नेऊन ठेवली. हा विख्यात २०१२ सालचा लिलाव. तो दणाणून आपटला. कारण हा लिलाव ‘२जी’साठी होता. त्यानंतरच्या २०१४ सालच्या लिलावापर्यंत दूरसंचार नियामक जमिनीवर आले आणि त्यांनी दिल्ली आणि मुंबईसाठीची राखीव रक्कम १७५ कोटी रु. आणि १६५ कोटी रु. इतकी कमी केली. प्रत्यक्षात लिलाव झाला त्या वेळी त्यातून दिल्ली आणि मुंबईसाठी अनुक्रमे ३६४ कोटी रु. आणि २७२ कोटी रु. मिळाले. पुढच्या लिलावांसाठी मग ही रक्कम आधारभूत मानण्याचे दूरसंचार नियामकाने ठरवले. पण २०१६ साली या लिलावात दूरसंचार नियामकाची अब्रू पुन्हा धारातीर्थी पडली. या लिलावात देशभरातील २२ परिमंडळांसाठी ध्वनिवर्णपट विकला गेला. त्यात आधीच्या लिलावातील आधारभूत रकमेच्या चारपट अधिक रक्कम राखीव ठेवली गेली. ही रक्कम होते साधारण ११,४८५ कोटी रु. प्रति मेगाहर्ट्झ इतकी. हे असे का केले गेले? यास कोणतेही तार्किक उत्तर नाही. वास्तविक त्याही वेळी अनेक तज्ज्ञांनी ही अपेक्षा अवाजवी असल्याचा इशारा दिला होता.

# या शेताने लळा लाविला असा असा की..

महाराष्ट्रात करोना विषाणूचा शिरकाव गेल्या वर्षी याच महिन्यात झाला. पहिल्यांदा तो केरळात आला नि मग आपल्याकडे. त्या दिवसापासून महाराष्ट्र आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला घरघर लागलेली दिसून येते. आजही हा विषाणू नियंत्रित करण्याचे आटोकाट प्रयत्न सुरूच आहेत. देशातील सर्वाधिक रुग्ण आणि सर्वाधिक बळी महाराष्ट्रातच नोंदवले गेले. त्यामुळे करोनानियंत्रणासाठी खबरदारी म्हणून सर्वाधिक काळ कडक टाळेबंदी महाराष्ट्रातच लागू होती. यातून आर्थिक क्रियाकलाप थबकल्यामुळे, मागणी सुस्तावल्यामुळे, पतपुरवठा गोठल्यामुळे आर्थिक अधोगती अपेक्षित होती. राज्य विधिमंडळात शुक्रवारी सादर झालेल्या सन २०२०-२१ वर्षांच्या आर्थिक पाहणी अहवालातील आकडेवारी विकासकथेऐवजी भकासगाथाच सांगणारी ठरते. देशाप्रमाणेच चालू आर्थिक वर्षांतला सकल राज्यांतर्गत उत्पादनवाढीचा वेग उणे आठ टक्के इतका नोंदवला गेला. महाराष्ट्र म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेचे निर्विवाद इंजिन. सर्वाधिक औद्योगिकीकरण आणि नागरीकरण, त्यामुळे सर्वाधिक रोजगारनिर्मिती आणि रोजगारसंधी याच राज्यात. यातूनच सर्वाधिक कररूपी महसूल मिळवून देणारे राज्यही महाराष्ट्रच. तेव्हा महाराष्ट्राला करोनाची घरघर लागल्याचा परिणाम देशावर दिसून येणेही स्वाभाविकच. भीती आणि नैराश्याने ग्रासलेल्या या कालखंडातही राज्याच्या अर्थचक्राला थोडाफार आधार कृषी क्षेत्राने दिलेला आढळतो. सर्वच क्षेत्रांमध्ये घसरण दिसून येत असताना, कृषी व संलग्न क्षेत्रांमध्ये ११.७ टक्क्यांची घसघशीत वाढ दिसून आली. उद्योगप्रधान राज्यामध्ये अशा प्रकारे कृषी क्षेत्राने मुसंडी मारणे हे या संपूर्ण क्षेत्राविषयीचा दृष्टिकोनच बदलायला लावणारे ठरू शकते. देशातील विद्यमान नेतृत्वाचा भर हा औद्योगिकीकरण, खासगीकरणावर असताना शेतकऱ्यांनी करोनाची भीती न बाळगता आपले काम देशात व या राज्यातही चोख बजावलेले आहे. देशाप्रमाणेच राज्यातही अर्थव्यवस्थेमध्ये थोडीफार धुगधुगी दिसून आली ती शेतकऱ्यांमुळेच. तेव्हा त्यांच्यासाठी कायदे करण्यापूर्वी त्यांना विश्वासात घेणे महत्त्वाचे. त्याचबरोबर शेतकरी आंदोलनावर राष्ट्रविरोधी वगैरे शिक्के मारणे किती अस्थानी आहे हे राज्यातील शेतकऱ्यांनी दाखवून दिले आहे.



आर्थिक पाहणी अहवालात इतर क्षेत्रांविषयी सादर झालेली आकडेवारी मात्र चिंता वाढवणारी ठरते. कृषी व संलग्न क्षेत्राविषयीची आकडेवारी आधी दिलेलीच आहे. बाकी सारा घसरणीचाच कारभार आहे. उद्योग क्षेत्रात ११.३ टक्के, सेवा क्षेत्रात नऊ टक्के घट अपेक्षित धरण्यात आली आहे. उत्पादन क्षेत्र आणि बांधकाम क्षेत्रातील मरगळ अजूनही कायम आहे. या क्षेत्रांमध्ये अनुक्रमे ११.८ टक्के आणि १४.६ टक्के घट अपेक्षित आहे. यामुळे राज्याच्या उत्पन्नामध्ये यंदा एक लाख कोटी रुपयांची प्रचंड तूट अपेक्षित असल्याचे राज्याचे वित्तमंत्री अजित पवार यांनी गुरुवारीच विधान परिषदेत जाहीर केले आहे. चालू आर्थिक वर्षांत राज्य सरकारने तीन लाख ४४ हजार कोटींचे महसुली उत्पन्न अंदाजित धरले होते. परंतु जानेवारीअखेरीस यांपैकी एक लाख ८८ हजार कोटीच महसूलरूपी जमा झाले होते. एप्रिल ते डिसेंबर या काळात एक लाख ७६ हजार ४५० कोटी म्हणजे जेमतेम ५० टक्केच महसूल गोळा झाल्याचे आर्थिक अहवालात म्हटले आहे. यांतील काही घट अपेक्षित होती. उदा. १ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत मुंबई महानगर क्षेत्रातील बांधकामांना मुद्रांक शुल्कात तीन टक्के सवलत देण्यात आली होती. ही सवलत १ जानेवारीपासून दोन टक्क्यांवर आणण्यात आली. मागणी वाढवण्यासाठी अशी जोखीम पत्करणे क्रमप्राप्त असले, तरी यातून महसुली उत्पन्नामध्ये होणारे खड्डे बुजवणे सोपे नसते. मोटार वाहन कर आणि राज्य उत्पादन शुल्कातही सवलती दिल्या गेल्या, त्याचा परिणाम उत्पन्नावर झाला असे अहवालात कबूल करण्यात आले आहे.

उत्पन्नच अर्ध्यावर आले तरी खर्च संपत नाहीत. वेतन आणि निवृत्तिवेतन, विविध कर्जांवरील व्याजापोटी द्यावा लागणारा निधी, आस्थापनांवरील खर्च फुगतच असतात. देशाप्रमाणेच राज्याची अर्थव्यवस्थाही करोनापूर्व काळातच रखडू लागली होती. कर्जभार प्रचंड होता. यातच मागील वर्षांच्या तुलनेत चालू वर्षांत वेतन, निवृत्तिवेतन आणि व्याजप्रदाने यावरील अनिवार्य खर्चात ७.६ टक्के वाढ अपेक्षित आहे. महसुली खर्चात वेतनापोटी द्यावयाच्या निधीचे प्रमाण ४३ टक्के आहे. राज्यावरील कर्जाचा बोजा ५,२०,७१७ कोटी इतका प्रचंड आहे. राज्याचे हक्काचे उत्पन्न म्हणजे अर्थातच वस्तू व सेवा करापोटी मिळणारे उत्पन्न. पण केंद्र सरकारकडून अजूनही या करापोटी राज्यांना द्यावयाच्या निधीचे पूर्ण वितरण झालेले नाही. याची झळ इतर लहान राज्यांपेक्षा महाराष्ट्रासारख्या मोठय़ा व उद्योगप्रधान राज्याला विशेषत्वाने बसत आहे. राज्यात आणि केंद्रात वेगवेगळ्या पक्षांची सरकारे असणे हे या देशात नवीन नाही. पण करोनोत्तर फेरउभारणीसाठी राज्य-केंद्रात जो स्नेहयुक्त संवाद आणि सहकार्य असावे लागते त्याच्या अभावाचा फटका महाराष्ट्राला बसतो आहे. वास्तविक अशा प्रकारे वागणूक महाराष्ट्राला मिळणे ही केंद्रासाठीच आत्मवंचना ठरेल. कारण महाराष्ट्राची वृद्धी ही अखेरीस केंद्राच्या तिजोरीतही भर टाकणारीच ठरते. तरीही नवीन प्रकल्प असोत वा वस्तू व सेवा कराचे वितरण असो, केंद्र सरकारची विकासविषयक धोरणे हल्ली आर्थिकऐवजी राजकीय असतात हे वारंवार सिद्ध होते.

केंद्राकडून मिळणाऱ्या वागणुकीत फरक पडणार नाही हे गृहित धरून राज्यातील नेतृत्वाला आर्थिक आघाडीवर वाटचाल करावी लागेल. आर्थिक आघाडीवर आव्हाने असल्यामुळे फार अपेक्षा बाळगू नका, असा इशारा वित्तमंत्र्यांनी दिला आहे. नागरिकांच्या अपेक्षांचे सोडा, परंतु राज्य नेतृत्वाने तरी आशावादी आणि महत्त्वाकांक्षी असायला कुणाची हरकत आहे? उद्योगस्नेही धोरणांच्या अंमलबजावणीत काय त्रुटी दिसून येतात हे या स्तंभात आम्ही काही दिवसांपूर्वी मांडलेलेच आहे. ‘मॅग्नेटिक महाराष्ट्र’सारख्या योजनांच्या माध्यमातून देशी-विदेशी कंपन्यांकडून गेल्या वर्षी जून महिन्यात १.१३ लाख कोटी रुपयांचे निव्वळ प्रस्ताव आले आहेत. या प्रस्तावांची फलश्रुती कशी होईल, यावर विचार करण्याची गरज आहे. जमीन आणि पाणी उपलब्ध करून द्यायचे, किफायती किमतीत संपूर्ण कारखाना उभारण्याची संमती द्यायची, पण अशा उभारणींमध्ये येणाऱ्या अडथळ्यांच्या निराकरणात (विशेषत स्थानिक ‘भूसम्राटां’च्या खंडणीखोरीविरोधात उभे राहण्याची) इच्छाशक्ती दाखवायची नाही, यातून उद्योगविकास कसा काय साधणार?

करोना उच्छाद लवकर जाईल किंवा जाणार नाही. राज्यात तीन पक्षांचे आघाडी सरकार आहे. त्यामुळे निदान एकांगीपणाचा धोका तरी नाही. शहरी अस्मिता, ग्रामीण भान व राष्ट्रीय दृष्टिकोन असलेल्या तीन पक्षांनी एकत्र आल्यावर खरे तर अडचणींना पूर्णविराम मिळायला हरकत नाही. आरोग्ययंत्रणेच्या बाबतीत महाराष्ट्र उद्योगक्षेत्रा-प्रमाणेच इतर बहुतेक राज्यांच्या तुलनेत सुस्थितीत असल्याचे करोना महासाथीने दाखवून दिले. मात्र टाळेबंदी शिथिलीकरणाबाबतीत झालेला विलंब किंवा सिंचनाच्या वाढीव क्षेत्राची आकडेवारीच आर्थिक पाहणी अहवालात न मांडणे वगैरे प्रकार आर्थिक शहाणपण दाखवणारे नाहीत. ‘महाराष्ट्र थांबला नाही आणि थांबणार नाही’ वगैरे वाक्ये टाळीखेचक म्हणून ठीक. पण कृषी वगळता बाकीची क्षेत्रे थांबलीच नाही, तर थिजली आहेत. त्यांना चालना देण्यासाठी केवळ नावात महाविकास असून भागत नाही, विकासाभिमुख वागावे लागेल.

## मोलकरणीने चोरलेले दागिने बॉयफ्रेंडकडे दिले; दोघेही 'असे' अडकले सापळ्यात



नोएडा: नोएडाच्या सेक्टर १०० मधील लोटस बुलेवर्ड सोसायटीतील एका फ्लॅटमध्ये झालेल्या दागिने चोरीचा छडा लागला आहे. दागिने

चोरी करणाऱ्या मोलकरणीला आणि तिच्या प्रियकराला सेक्टर-३९ पोलिसांनी सेक्टर ४४मधून अटक केली आहे. मोलकरणीने दागिने चोरी करून प्रियकराकडे दिले होते. त्याने एका फायनान्स कंपनीत सोने तारण ठेवून कर्ज घेतले होते.

पोलिसांच्या माहितीनुसार, रिया असे मोलकरणीचे नाव आहे. ती सेक्टर १०० मधील लोटस बुलेवर्ड सोसायटीत राहणाऱ्या एका मॅनेरजच्या घरी काम करत होती.


त्यांच्याच फ्लॅटमध्ये ती राहायची. रियाने मॅनेजरच्या खोलीतून सोन्याच्या बांगड्या, सोनसाखळी, हिऱ्याची अंगठी चोरली. या प्रकरणी संबंधित मॅनेजरने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी तपास सुरू केला.

मोलकरणीने चोरलेले दागिने सेक्टर ९३ मध्ये राहणारा तिचा प्रियकर अमर कुमार याच्याकडे दिले.

त्याने दिल्लीतील अशोक विहार येथील एका फायनान्स कंपनीत ते तारण ठेवले आणि त्यावर कर्ज घेतले. त्या कर्ज घेताना मोलकरणीचे ओळखपत्र दिले होते. यामुळे त्यांच्या गुन्ह्याचा छडा लागला. पोलिसांनी रिया आणि अमर कुमार यांना अटक केली.

## घरकामगार तरुणीची आत्महत्या; तपास सुरु

हडपसर, पांढरे मळा येथे राहणारी एका तरुणीने तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याचा प्रकार रविवारी सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास घडला, ही घटना हडपसर येथील अग्रवाल गंगा रेसीडेन्सी या इमारतीच्या ठिकाणी घडली, रक्ताच्या थारोळयात पडलेल्या तरुणीला शेजारी राहणाऱ्या नागरिकांनी तत्काळ रुग्णालयात नेले. मात्र, डॉक्टरांनी उपचारापूर्वीच तिला मृत घोषित केले. तब्बू शेख (वय १९, रा. पांढरेमळा, हडपसर) असे तरुणीचे नाव आहे. आत्महत्यांचे कारण समजू शकले नाही. याबाबत हडपसर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. हडपसर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक सागर पोमण यांनी दिलेल्या माहितीनुसार, तब्बू शेख गंगा रेसिडन्सी सोसायटीत घरकामगार म्हणून काम करीत होती. रविवारी तिने सोसायटीच्या गच्चीवर जाऊन खाली उडी मारली. तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे ती रक्ताच्या थारोळयात पडली. आजूबाजूच्या नागरिकांनी काय पडले, असे म्हणून धाव घेतली, तेव्हा तब्बूला गंभीर जखमी पाहून नागरिकांनी तत्काळ पोलिसांना कळवले. तिला उचलून जवळील रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी उपचारापूर्वीच मृत झाल्याचे घोषित केले, त्यानंतर तिला घटनेची माहिती घेतली. त्यानंतर ससून रुग्णालयात तिला पाठवण्यात आले. घटनास्थळी पोलिसांनी जाऊन घटनेची माहिती घेतली.



## नागपूर रेल्वे स्थानकात एक्स्प्रेसमधून पार्सल आले होते, उघडले असता...



नागपूर: नागपूर रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ८ वर आज सकाळी ३६ लाख रुपयांच्या सिगारेट जप्त करण्यात आल्या. गस्तीवर असलेल्या आरपीएफच्या पथकाला प्लॅटफॉर्म क्रमांक ८ वर काही पार्सल आढळले. हे पार्सल उघडले असता, त्यात सिगारेटची पाकिटे होती. त्यांची किंमत ३६ लाख रुपये आहे.

अंबाला- बिलासपूर एक्स्प्रेसने हे पार्सल शनिवारी नागपूर येथे आणण्यात आले होते. मालाच्या विवरणात आत लेदर असल्याचे लिहिले होते. मात्र त्यातून तंबाखूचा गंध येत होता. त्यामुळे संशयावरून ते उघडून पाहिले असता, आत सिगारेट असल्याचे लक्षात आले. या सिगारेट पाकिटांची किंमत ३६ लाख रुपये आहे. रेल्वे पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

नागपूर रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर रेल्वे पोलिसांनी अशीच कारवाई केली होती. जवळपास ९ लाख ६० हजार रुपयांच्या सिगारेट जप्त करून एकाला अटक केली होती. २८ फेब्रुवारीच्या रात्री ११.३० च्या सुमारास पोलिसांनी ही कारवाई केली होती. हावडा-अहमदाबाद एक्सप्रेस प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर उभी होती. त्याचवेळी आरपीएफ निरीक्षक आर. एल. मीना, कॉन्स्टेबल राजेश गडपलवार, श्याम झाडोकर हे तेथे गस्तीवर होते. या एक्स्प्रेसमधून पार्सल उतरवण्यात आले होते. तिथेच एक तरुण संशयितरित्या आढळून आला. पार्सलमधून तंबाखूचा गंध येत होता. त्यामुळे आरपीएफने त्याला विचारणा केली. क्लार्कला बोलावून पार्सल उघडले असता, त्यात सिगारेटची १९,२०० पाकिटे आढळून आली.

## हॉटेलच्या नावाखाली सुरु होते हुक्का पार्लर, पोलीस पथक धडकले; पण...

हडपसर: ग्रामीण हद्दीतील होळकरवाडी येथील "हॉटेल जे २ के" या हुक्का पार्लरमध्ये शनिवारी रात्री लोणी काळभोर पोलिसांची धाड टाकून हुक्का पार्लरच्या मालकासह पाच जणांना अटक केली. तर हुक्का ओढणारे मागील दरवाजातून पळून गेले. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये हॉटेल मालक अक्षय दिलीप जगताप (वय २९, रा. हांडेवाडी, ता. हवेली पुणे), मॅनेजर कुमार विलास गोफणे (वय ३०, रा. होळकरवाडी, ता. हवेली, जि. पुणे) सचिन मधुकर मोटे (वय ३३, रा. हांडेवाडी, ता. हवेली, जि. पुणे), आकाश राजू कहार (वय २४, रा. गाडीतळ, हडपसर), गजेंद्र अशोक काटकर ( वय ३१, रा. तुकाई दर्शन, हडपसर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.



लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सूरज बंडगर यांनी सांगितले, होळकर वाडी येथे मोठ्या प्रमाणात हुक्का पार्लर चालू असल्याचे सहायक पोलीस निरीक्षक राजू महानोर यांना मिळाली होती. त्यानुसार महानोर यांनी पोलीस पथकांच्या मदतीने "हॉटेल जे २ के " मध्ये शनिवारी रात्री दहा वाजता धाड टाकली. यावेळी पोलीस हॉटेलमध्ये घुसताच हॉटेलमधील हुक्का ओढणाऱ्यांनी मागील दरवाजातून पळ काढला, तर हॉटेल मालक अक्षय जगताप, मॅनेजर कुमार गोफणे याच्यासह तीन वेटरना ताब्यात घेतले. हॉटेल मालक अक्षय जगताप यांना हुक्का पार्लरच्या परवानगीबाबत विचारणा केली असता, त्यांनी हुक्का चालविण्याचा कोणताही परवाना नसलेचे सांगितले.

# कारकर्जात फसवणूक; दोघाविरुद्ध गुन्हा




औरंगाबाद, कर्ज घेताना दाखविण्यात आलेल्या कोटेशननुसार कार खरेदी न करता त्यापेक्षा कमी किंमतीची कार खरेदी करत बँकेची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी स्टेट बँकेचे शाखा व्यवस्थापक पंकजकुमार साहू यांच्या तक्रारीवरून कर्जदार मुस्ताक मोईन शेख याच्यासह मोटर्स डिलरचे व्यवस्थापक मनीष धूत यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला, अशी माहिती क्रांती चौक पोलिसांनी दिली. हा प्रकार २०१९ मध्ये घडला आहे.

अदालत रोडवरील धुत मोटार्समधून कार खरेदी करण्यासाठी मुश्ताक मोईन शेख (रा. गट क्र. ९२, प्लॉट क्र. ८१, शाहीनगर, मिटमिटा) याने ११ लाख दोन हजार ९६२ रुपयांचे कोटेशन शोरुममधून घेतले होते. कार खरेदीसाठी त्याने हे कोटेशन जालना रोडवरील अमरप्रित चौकात असलेल्या स्टेट बँकेच्या शाखेमध्ये सादर केले. त्यावर बँकेने मुश्ताक शेख याला कार खरेदीसाठी ९ लाख ३७ हजार रुपयांचे कर्ज दिले. कर्जाची रक्कम मुश्ताक शेख याच्या बँक खात्यात जमा झाल्यानंतर त्याने मूळ कारऐवजी ७ लाख ४० हजार १४५ रुपये किंमतीची कार खरेदी केली. बँकेचे शाखा व्यवस्थापक पंकजकुमार राजेंद्रप्रसाद साहू यांनी डिसेंबर २०२० मध्ये बँकेचे लेखा परीक्षण केले. हा फसवणुकीचा प्रकार समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी अधिक तपास सहायक पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ करत आहेत.

# माजी आमदाराच्या वडिलांकडे घरफोडी



नागपूर : गोंदिया जिल्ह्यातील आमगाव येथील माजी आमदार संजय पुराम यांच्या वडिलांकडे धाडसी घरफोडी करून चोरट्यांनी रोख रकमेसह सहा लाखांचे दागिने लंपास केले. ही घटना शुक्रवारी सकाळी बेलतरोडीतील गोंडवानानगर येथे उघडकीस आली. जानूभाऊ पुनाजी पुराम (वय ७२) यांनी दिलेल्या तक्रारीवरून बेलतरोडी पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला.

संजय पुराम याच्याकडे ४ मार्चला कार्यक्रम होता. यासाठी जानूभाऊ कुटुंबीयांसह गोंदिया येथे गेले. संधी साधून चोरट्याने दाराचे कुलूप तोडले. आलमारीतील २५ हजारांची रोख, घड्याळ व दागिने चोरी केले. शुक्रवारी सकाळी शेजाऱ्याला पुराम यांच्या घराचे दार उघडे दिसले. त्याने जानूभाऊ यांना माहिती दिली. जानूभाऊ नागपुरात आले व बेलतरोडी पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल करून चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

# बालविकास प्रकल्प अधिकाऱ्याची आत्महत्या



भंडारा, लाखनी येथील एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी शितल अशोक फाळके (३०) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी पहाटे उघडकीस आली.

या घटनेमुळे जिल्हा प्रशासनात खळबळ उडाली आहे. शितल फाळके या मूळच्या सातारा जिल्ह्यातील पाळडी येथील रहिवासी होत्या. सध्या लाखनी येथील प्रभाग पाचमध्ये आईसोबत भाड्याने राहत होत्या. लाखनी येथे बालविकास प्रकल्प अधिकारी म्हणून जून २०१७मध्ये रुजू झाल्या. कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची ख्याती होती. मागील काही दिवसांपासून तणावात होत्या, अशी माहिती कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी दिली. शुक्रवारी रात्री जेवण करून दोघेही झोपी गेल्या. दरम्यान, पहाटेच्या सुमारास आईला जाग आली. बाथरुममध्ये गेल्या असता शितल गळफास लावलेल्या स्थितीत दिसून आला. आईने आरडाओरड केली असता घरमालक व शेजारी घटनास्थळी जमा झाले. पोलिस निरीक्षक मनोज वाडीवे, सहाय्यक फौजदार विजय हेमने, पोलिस नायक उमेश शिवणकर, महिला पोलिस नाईक वासंती बोरकर, पोलिस शिपाई नितीन झंझाड, चालक मंगेश चाचेरे यांनी घटनास्थळी धाव घेतली.

# मोठी बातमी! अंबानींच्या घराबाहेरील स्फोटकांचा तपास NIA करणार; हिरन मृत्यू प्रकरण ATS कडे!

**मुकेश अंबानी यांच्या घराजवळील स्फोटक प्रकरणाचा तपास आता एनआयएकडे सोपवण्यात आला आहे. तसे आदेश गृहमंत्रालयाने एनआयएला दिले आहेत. तर मनसुख हिरन प्रकरण महाराष्ट्र एटीएसकडे सोपवले आहे.**







मुंबई: उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या मुंबईतील 'अँटिलिया' निवासस्थानाजवळ पार्क केलेल्या कारमध्ये जिलेटिनच्या कांड्या सापडल्या होत्या. तसेच मुकेश अंबानी यांना पत्राद्वारे धमकीही देण्यात आली होती. कारमधील स्फोटक प्रकरणाचा तपास आता राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) करणार आहे. तर कारचा मालक मनसुख हिरन यांच्या मृत्यू प्रकरणाचा तपास दहशतवादविरोधी पथक करणार आहे.

मुकेश अंबानी यांच्या निवासस्थानाबाहेर रस्त्यालगत कार पार्क करण्यात आली होती. या कारमध्ये जिलेटिनच्या कांड्या आणि एक धमकीचे पत्र सापडले होते. या पत्राद्वारे मुकेश अंबानी आणि कुटुंबीयांना धमकावण्यात आले होते. या घटनेनंतर खळबळ उडाली होती. सुरुवातीला केलेल्या तपासात ही कार मनसुख हिरन यांची असल्याचे उघड झाले होते. विक्रोळीतून ती चोरीला गेल्याचे तपासात स्पष्ट झाले होते. या प्रकरणात त्यांचीही चौकशी करण्यात आली होती.

दुसरीकडे या घटनेची जबाबदारी एका संघटनेने घेतली होती. दरम्यान, या घटनेवरून राज्याच्या राजकीय वर्तुळातही खळबळ उडाली होती. फडणवीस यांनी या प्रकरणाचा तपास एनआयएकडे देण्यात यावा, अशी मागणी केली होती. या घटनेचा तपास सुरू असतानाच, मनसुख हिरन अचानक बेपत्ता झाले होते. दुसऱ्या दिवशी त्यांचा मृतदेह मुंब्रा येथील रेतीबंदर खाडीत सापडला होता. रविवारी अखेर महाराष्ट्र एटीएसने हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. अनोळखी व्यक्तीविरोधात हा गुन्हा दाखल केला आहे.

हिरन यांच्या पत्नी विमला यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाण्यातील नौपाडा पोलीस ठाण्यात यापूर्वी हिरन हे बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर त्यांचा मृतदेह सापडला होता. मुंब्रा पोलीस ठाण्यात एडीआर दाखल करण्यात आला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्राच्या गृह विभागाच्या निर्देशानुसार हिरन मृत्यू प्रकरणाचा तपास दहशतवाद विरोधी पथकाकडे सोपवण्यात आला आहे. या मृत्यू प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रे ही एटीएसकडे देण्यात आली आहेत.

आता एटीएस या प्रकरणाचा तपास करणार आहे. दुसरीकडे, अंबानी यांच्या घरासमोर सापडलेल्या स्फोटक प्रकरणाचा तपास आता एनआयए करणार आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने हा तपास एनआयएकडे सोपवला आहे.

# टिळा लावायच्या कार्यक्रमात ब्रँडेड कुंकू वापरलं नाही; उच्चशिक्षित तरुणानं लग्न मोडलं



वाडा: लग्न ठरलं. टिळा लावण्याचा कार्यक्रमही झाला. पण या कार्यक्रमात ब्रँडेड कुंकू वापरले नाही, म्हणून एका उच्चशिक्षित तरुणाने चक्क लग्नच मोडले. या प्रकरणी नवरा मुलगा, त्याचे आईवडील आणि काकाविरोधात पालघरमधील वाडा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भिवंडी तालुक्यातील घोटगाव येथील मुळचे कुटुंब सध्या वसईत राहतं. त्यांनी त्यांच्या सिव्हिल इंजिनीअर मुलाचे लग्न वाडा तालुक्यातील एका उच्चशिक्षित मुलीसोबत ठरवले होते. हे लग्न जमवण्यासाठी मुलाच्या काकाने पुढाकार घेतला होता. त्या अनुषंगाने हे लग्न जमल्यानंतर ३० ते ४० लोकांच्या उपस्थितीत टिळा लावण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.

नवऱ्या मुलाकडील मंडळींचे मुलीच्या वडिलांनी आगतस्वागतही केले. कपड्यांच्या भेटी दिल्या. जेवणही दिले. मात्र दुसऱ्या दिवशी साखरपुड्याची तारीख ठरवण्यासाठी नवरी मुलीच्या वडिलांनी नवरा मुलगा आणि त्याच्या काकांना विचारणा केली असता, मुलांनी त्यांना चक्क आपली सोयरीक जमणार नसल्याचे सांगितले. यानंतर नवरीच्या वडिलांनी मुलाच्या काकांना फोन करून कारण विचारले. पण त्यांनी फोन उचलला नाही.

यानंतर मुलीचे वडील व एक-दोन नातेवाइक मध्यस्थ यांना घेऊन मुलाच्या वडिलांकडे गेले असता, मुलाचा काका घरात लपून बसला व आलेल्या मध्यस्थांना व मुलीच्या वडिलांना भेटला नाही. यानंतर प्रचंड मानसिक तणावाखाली असणारे मुलीचे वडील व कुटुंबातील व्यक्ती यांनी याबाबत वाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधीर संखे यांनी मुलाचे वडील, काकाला पोलीस ठाण्यात बोलावले. पण ते आले नाहीत. नवरा मुलगा व त्याचे नातेवाइक वाडा पोलीस ठाण्यात गेले. त्यावेळी पोलिसांनी लग्न मोडण्याचे कारण विचारले. त्यावर मुलाने दिलेले उत्तर ऐकून सर्वांना धक्काच बसला. टिळा लावण्याच्या कार्यक्रमावेळी वापरलेले कुंकू हे ब्रँडेड नव्हते; तसेच माझ्याशी मुलीची आई बोलली नाही, अशी थातुरमातुर कारणे दिली.

मुलीच्या वडिलांनी याबाबत तक्रार दिल्यानंतर, पोलिसांनी मुलाचे वडील, आई, काकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत. अशा प्रकारे मुलीची व तिच्या कुटुंबाची फसवणूक करणाऱ्या कुटुंबाविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# 'नगर अर्बन' प्रकरणी दोघांना अटक



पिंपरी, नगर अर्बन को-ऑप बँकेची २२ कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने शनिवारी बँकेच्या एका तत्कालीन संचालकासह दोन आरोपींना अटक केली आहे. पिंपरीतील मोरवाडी न्यायालयात हजर केले असता, या दोन्ही आरोपींना न्यायालयाने मंगळवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. या प्रकरणात बँकेचे तत्कालीन संचालक माजी खासदार दिलीप गांधी यांचीही चौकशी होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

नवनीत शांतिलाल सूरपुरिया (रा. नगर), तसेच यज्ञेश बबन चव्हाण (रा. संभाजीनगर, चिंचवड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी महादेव पंढरीनाथ साळवे (वय ५६, रा. नगर) यांनी चिंचवड पोलिस ठाण्यात २५ जानेवारी २०२१ रोजी फिर्याद दिली होती. बँकेच्या चिंचवड येथील शाखेत २६ मार्च २०१८ ते २५ जानेवारी २०२१ दरम्यान हा प्रकार घडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार बबन निवृत्ती चव्हाण, वंदना बबन चव्हाण,

यज्ञेश बबन चव्हाण, मंजुदेवी हरिमोहन प्रसाद (सर्व रा. चिंचवड), रामचंद्र अण्णासाहेब तांबिले (रा. वाल्हेकरवाडी), अभिजित नाथा घुले (रा. नगर) यांच्यासह कर्ज उपसमिती सदस्य, तसेच नगर अर्बन को-ऑप बँकेचे संचालक सदस्य यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक वसंत बाबर यांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांना बँकेच्या प्रशासकांनी प्राधिकृत केले आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, 'मे. नेश लिब टेक्नोरिअल' व 'मे. इंडियन इंजिनीअरिंग इंडस्ट्रिज, पुणे' या फर्मचे कर्जदार आरोपी यांनी संगनमत करून स्वत:च्या फायद्यासाठी कर्जप्रकरण केले. त्यासाठी तारण गहाण मिळकतीचा बनावट मूल्यांकन अहवाल दिला. कर्ज उपसमिती सदस्य व बँकेच्या संचालक सदस्यांनी तो अहवाल स्वीकारून बँकेची २२ कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केली.

पोलिस आयुक्त कृष्ण प्रकाश यांनी या प्रकरणी तपासाचे आदेश दिल्यानंतर आर्थिक गुन्हे शाखेचे पथक शनिवारी पहाटे नगर येथे रवाना झाले. आठ अधिकाऱ्यांच्या पथकाने नगर येथून बँकेचे तत्कालीन संचालक नवनीत सूरपुरिया यांना अटक केली, तसेच चिंचवड येथे आरोपी यज्ञेश चव्हाणला अटक केली. नगर येथील माजी खासदार दिलीप गांधी बँकेचे तत्कालीन संचालक असून, त्यांच्या संचालकपदाच्या कार्यकाळात बँकेची फसवणूक झाली. त्यामुळे या प्रकरणात त्यांचीही चौकशी होईल, असे पोलिस निरीक्षक बाबर यांनी सांगितले.

# पत्नीची आत्महत्या; माजी नगरसेवकावर गुन्हा




औरंगाबाद : घरगुती कारणावरून माजी नगरसेवक जफर बिल्डर याने मारहाण केल्याने तिसऱ्या पत्नीला आत्महत्या केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला. त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आले आहे. जफरने नुकताच राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

त्याने तिसरे लग्न रोशनगेट करीम कॉलनी येथील फरजाना बेगम हिच्याशी २०१५ मध्ये केले होते. त्यांना एक मुलगी आहे. जफर तिला व तित्या आई, बहिणीला मारहाण करीत होता. फरजानाने पोलिसांकडे तक्रार नोंदवली होती. मात्र समेट घडल्याने पुन्हा दोघे एकत्र राहत होते. दोघांत मंगळवारी रात्री कडाक्याचे भांडण झाले. सततच्या छळास कंटाळून पहाटे तिने विषारी औषध घेतले. फरजानाचा भाऊ सैयद रईस सैयद अयुब यांच्या तक्रारीवरून पोलिस निरीक्षक व्यंकटेश केंद्रेकर यांनी तपास सहायक निरीक्षक साईनाथ गिते यांच्याकडे सोपविला.

# पाकिस्तानात हिंदू कुटुंबातील 5 जणांचे मृतदेह आढळले; हत्या झाल्याची माहिती



मुलतान: पाकिस्तानमधील पंजाब प्रांतात एका हिंदू कुटुंबातील पाच सदस्यांचे मृतदेह संशयास्पदरित्या आढळून आले. एकाच कुटुंबातील पाच सदस्यांची धारदार शस्त्रांनी गळा चिरून हत्या करण्यात आली. मुलतानच्या रहीम यार खान शहरापासून १५ किलोमीटरवर असलेल्या अबू धाबी कॉलनीत ही घटना घडली.

एकाच कुटुंबातील पाच सदस्यांची हत्या झाल्याने खळबळ उडाली आहे. न्यूज इंटरनॅशनलच्या रिपोर्टनुसार, पाच जणांचे मृतदेह संशयास्पद अवस्थेत आढळून आले आहेत. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलीस तिथे पोहोचले. पाचही जणांची धारदार शस्त्रांनी हत्या करण्यात आली होती. घटनास्थळावरून पोलिसांनी चाकू आणि कुऱ्हाड हस्तगत केली आहे.

रहीम यार खान येथील सामाजिक कार्यकर्ता बीरबल दास यांनी सांगितले की, रामचंद मेघवाल हे हिंदू होते. बीरबल दास यांनी सांगितले की, “मेघवाल हे ३६ वर्षांचे होते. बऱ्याच वर्षांपासून ते टेलरिंगचे दुकान चालवायचे. ते शांतताप्रिय होते. या घटनेने सर्वांनाच धक्का बसला आहे."

# मित्रांकडून अलीशान कार मागायचे, प्रवाशांना द्यायचे लिफ्ट, नंतर...



नोएडा: उत्तर प्रदेशातील नोएडा येथे धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मित्रांकडून महागड्या कार घेऊन त्यात प्रवाशांना लिफ्ट देऊन लुटणाऱ्या टोळीच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या. टोळीप्रमुख आणि अन्य दोघांना महामार्ग पोलिसांनी शुक्रवारी रात्री अटक केली.

अटक केलेले आरोपी शस्त्रांचा धाक दाखवून कारमधून प्रवास करणाऱ्यांकडून दागिने, रोकड आणि एटीएम लुटायचे. आरोपींनी आतापर्यंत २०० हून अधिक प्रवाशांना लुटल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. या टोळीतील इतर सदस्य अद्याप फरार आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, सेक्टर १६८मधून तिघा आरोपींना अटक केली आहे. जावेद उर्फ जाबिर, उलूम उर्फ अन्नी आणि मनोज अशी तिघांची नावे आहेत. आरोपींकडील कार, ११ हजारांची रोकड, पाच बनावट नंबर प्लेट आणि एक पिस्तुल पोलिसांनी जप्त केले आहे. जावेद उर्फ जाबिर हा टोळीचा प्रमुख आहे. त्याच्यावर नोएडा-ग्रेटर नोएडा आणि अलीगढमध्ये २८ गुन्हे दाखल आहेत. दोन वेळा तो तुरुंगात गेला आहे. नोव्हेंबरमध्येच तो तुरुंगातून सुटून बाहेर आला आहे. तर मनोजवर १५ आणि अन्नी याच्यावर ११ गुन्हे दाखल आहेत. आरोपी हे कारमध्ये लिफ्ट देऊन प्रवाशांकडील दागिने आणि रोकड लुटायचे. एखाद्या प्रवाशाकडे एटीएम मिळाले तर, त्याला केंद्रावर न्यायचे. शस्त्राचा धाक दाखवून त्याच्याकडून पैसे काढून घ्यायचे. लूट केल्यानंतर त्या प्रवाशाला निर्जन ठिकाणी नेऊन सोडून फरार व्हायचे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

**लुटीच्या पैशांतून तीन मजली घर**

टोळीचा प्रमुख जावेद उर्फ जाबिर याने लुटीच्या पैशांतून तीन मजली आलीशान घर खरेदी केले आहे. ग्रेटर नोएडाच्या दादरी परिसरात त्याचे हे घर आहे. लुटीच्या पैशांतून तो मालमत्ता खरेदी करायचा. पोलीस त्याच्या इतर मालमत्तांचाही शोध घेत आहेत.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898